# जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांचे मूल्यांकन आणि श्रेणीकरण

(14 ऑक्टोबर 2014 पर्यंत सुधारीत)

# जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांची मूल्यांकन आणि श्रेणीकरणाची योजना

## 1.0 व्याप्ती व उद्देश्य

1.1 वस्त्र समिती कडून भारतातील आधूनिक जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांचे मूल्यांकन व श्रेणीकरण करण्यासाठी व ह्या योजनेच्या सुविधा मिळविण्यासाठी आवश्यक बाबी पुढील प्रमाणे आहेत:

(क) जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांनी त्यांची सद्यस्थिती ओळखून करावयाच्या सुधारणांची व्याप्ती ठरविणे.

(ख) जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांनी त्यांच्या विश्वासार्हतेला चालना देण्यासाठी श्रेणीकरणाचा वापर प्रभावी विपणन साधन म्हणून करणे.

(ग) कापूस व्यापा यांनी त्यांच्या कापूस प्रक्रियेसाठी लागणा या आवश्यक गुणवत्तेसाठी योग्य जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांची निवड करणे.

(घ) स्पीनिंग मिल्सनी त्यांच्या आवश्यकतेनुसार लागणा या कापसाच्या स्त्रोतासाठी योग्य जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांची निवड करणे.

(ङ) स्वच्छ कापसाचा ब्रँड निर्माण करणे.

1.2 या योजने अंतर्गत मूल्यांकन व श्रेणीकरण करणे ऐच्छिक आहे.

## 2.0 व्याख्या

### 2.1 मूल्यांकन

या योजने मध्ये दिलेल्या निकषांच्या आधारे जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांतील मूलभूत सुविधांचे व प्रबंधन पद्धतींचे मूल्यमापन केले जाते.

## 2.2 जिनिंग व प्रेसिंग कारखाना

कापसाचे जिनिंग प्रक्रिया करुन व त्या पासून मिळणा या रुईचे प्रेसिंग करुन त्या रुईच्या गाठी तयार करणारा असा कारखाना ज्याला कायदेशीर मान्यता आहे त्याला जिनिंग व प्रेसिंग कारखाना म्हणता येईल.

**टिप:** ज्या जिनिंग व प्रेसिंग कारखान्यात सरकी पासून तेल काढण्याचे काम केले जाते, तिथे मूल्यांकनाची व्याप्ती केवळ जिनिंग व प्रेसिंग पर्यंतच मर्यादित राहिल.

## 2.3 आधूनिक जिनिंग व प्रेसिंग कारखाना

परिशिष्ट । मध्ये दर्शविल्याप्रमाणे कमीत कमी निकषांची पूर्तता करणारा कारखाना.

## 2.4 पायाभूत घटक

आधूनिक जिनिंग व प्रेसिंग कारखान्याच्या पायाभूत घटकांमध्ये जसे मशीनरी, सिव्हील व अन्य पायाभूत घटक इत्यादींचा विचार या योजने मध्ये मूल्यांकन करतांना केला जातो.

## 2.5 प्रबंधन घटक

या योजने मध्ये जिनिंग व प्रेसिंग कारखान्याच्या मूल्यांकनासाठी जिनिंग केलेल्या कापसात दूषितीकरणाच्या पातळीसह, प्रबंधन पद्धती व कार्य पद्धती विचारात घेतली जाते.

## 2.6 श्रेणीकरण

2.6.1 पायाभूत व प्रबंधकीय घटकांच्या मूल्यांकनानुसार आणि योजने मध्ये दिलेल्या श्रेणीकरणाच्या निकषांच्या आधारे जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांना विविध वर्गामध्ये ठेवण्याची श्रेणीकरण ही एक प्रक्रिया आहे.

2.6.2 कापसाचे जिनिंग गुणवत्तापूर्ण रितीने करण्याची क्षमता दर्शविण्यासाठी कारखान्यांचे मूल्यांकन करणे म्हणजे जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांचे श्रेणीकरण होय. परंतू श्रेणीकरण, उत्पादनाची गुणवत्ता प्रमाणित करत नाही.

## 2.7 हायब्रिड कारखाना

एकाच परीसरात आधूनिक जिनिंग व प्रेसिंग सुविधा असलेले आणि पारंपारिक व जून्या पद्धतीचे जिनिंग असेल आणि जर त्यापैकी एखादी आधूनिक व जूनी पारंपारीक प्रक्रिया संयुक्तपणे वापरत असतील तर तो कारखाना हायब्रिड होय.

# 3.0 प्रशासकिय व्यवस्था

## 3.1 मूल्यांकन व श्रेणीकरण सेल (एआरसी)

वस्त्र समितीने एक वेगळा सेल स्थापन केलेला आहे जो जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांच्या मूल्यांकन व श्रेणीकरण या विषयीचे अर्ज व इतर कागदपत्रांचे काम करतो. ईच्छुक जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांचे अर्ज स्विकारणे, मूल्यांकनासाठी कारखान्याला भेट देण्याकरीता दोन सदस्यांच्या दलाची नियुक्ती करणे, त्यांचा मूल्यांकन रिपोर्ट संकलित करणे व संकलित रिपोर्ट तांत्रीक श्रेणीकरण पुरस्कार समितीकडे विचारार्थ पाठविणे, व त्यांचे अनुमोदन घेणे इत्यादी प्रमुख कार्य मूल्यांकन व श्रेणीकरण सेल करीत असतो.

## 3.2 तांत्रीक श्रेणीकरण पुरस्कार समिती (टीआरएसी)

या समितीचे कार्य म्हणजे जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांचे श्रेणीकरण प्रदान करणे तसेच या योजनेमध्ये योग्य सूचना व शिफारसी करुन सुधारणा करणे.

मूल्यांकन दलाद्वारे प्रेषीत रिपोर्टचे आणि मूल्यांकन व श्रेणीकरण सेल द्वारा केलेले संकलन यांची तपासणी करणे आणि त्याद्वारे कारखान्यांना उचित श्रेणी प्रदान करणे.

सचिव, वस्त्र समिती, मुंबई हे या समितीचे मुख्य असतील तसेच इतर सदस्य खालील प्रमाणे असतील.

i. संयुक्त वस्त्र आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी जे उपसंचालक पदा पेक्षा कनिष्ठ नाहीत असे.
ii. भारतीय कपास निगमचे (सीसीआय) प्रतिनिधी.
iii. संचालक (ईपीएण्डक्यूए) किंवा त्यांचे प्रतिनिधी जे वस्त्र समितीतील उपसंचालक या पदा पेक्षा कनिष्ठ नाहीत असे.
iv. आवश्यकता असल्यास, असे मूल्यांकन दलाचे अधिकारी ज्यांनी जिनिंग व प्रेसिंग कारखान्याला भेट दिलेली आहे.

तांत्रीक श्रेणीकरण पुरस्कार समितीला (टीआरएसी) बैठकी मध्ये उपस्थित राहण्यासाठी त्यांच्या निवडीच्या आणखी काही व्यक्तीनां आमंत्रित करण्याचा अधिकार आहे. श्रेणीकरणाचे काम करतांना जेव्हा आवश्यकता भासते तेव्हा तांत्रीक श्रेणीकरण पुरस्कार समितीला (टीआरएसी) आपली बैठक घेता येईल.

## 3.3 तज्ञ समिती

वस्त्र समितीने संबंधित विषयातील आवश्यक शैक्षणिक पात्रता, ज्ञान, अनुभव व प्रशिक्षण इत्यादींच्या आधारे तज्ञ समितीची स्थापना केली आहे. प्रत्यक्ष मूल्यांकन करण्यासाठी तज्ञ समितीचे सदस्य जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांना भेटी देतील.

## 4.0 मूल्यांकनाची पात्रता

4.1 कोणत्याही जिनिंग व प्रेसिंग कारखान्याचे टीएमसी अथवा टीयूएफएसच्या अंतर्गत किंवा स्वत:चा नीधी वापरून आधूनिकीकरण झालेले असेल आणि परिशिष्ट। मध्ये दर्शविलेल्या कमीत कमी निकषांची पूर्तता करीत असेल तर तो कारखाना वस्त्र समितीच्या मूल्यांकनासाठी पात्र आहे.

4.2 एकाच परीसरामध्ये हायब्रिड सुविधा (पारंपारिक व आधूनिक अशा दोन्ही सुविधा) असलेले जिनिंग व प्रेसिंग कारखाने मूल्यांकनासाठी पात्र नाहीत.

## 5.0 नोंदणी सह मूल्यांकनासाठी अर्ज

मूल्यांकन व श्रेणीकरणासाठी ईच्छुक असलेल्या तसेच परिशिष्ट । मध्ये दर्शविलेल्या कमीत कमी निकषांची पूर्तता करीत असलेल्या जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांनी नोंदणी शुल्क रुपये 5000/ तसेच श्रेणीकरण अर्जाच्या शुल्कासह, परिशिष्ट ।। मध्ये दिलेल्या प्रारुपा नुसार, नोंदणीसाठी वस्त्र समितीकडे अर्ज करावेत.

जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांनी नोंदणीसाठी दिलेल्या अर्जातील माहीतीच्या आधारे मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून कमीत कमी निकषांची व अर्जातील अन्य माहीतीची तपासणी केली जाईल. जर कारखाना प्रथमदर्शनी मूल्यांकनासाठी पात्र दिसत असेल तर मूल्यांकनासाठी अर्जाची नोंदणी केली जाईल.

## 6.0 श्रेणीकरण शुल्क

3 वर्षांसाठी श्रेणीकरण शुल्क रुपये 35,000/ अधिक लागू कर असे आहे. या श्रेणीकरण शुल्कामध्ये तीन वर्षाच्या काळात कारखान्याची एक मध्यावधी संनिरीक्षण (Surveillance) भेट करण्याचा समावेश आहे.

## 7.0 मूल्यांकन प्रक्रिया

## 7.1 जिनिंग व प्रेसिंग कारखान्याला मूल्यांकन दलाची भेट

जिनिंग व प्रेसिंग कारखान्याचे मूल्यांकन करण्यासाठी मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून तज्ञ समिती मधील दोन सदस्यीय अधिकारी दल नियुक्त करण्यात येईल. मूल्यांकन करते वेळी जिनिंग व प्रेसिंग कारखाना चालू स्थितीत आहे तसेच मूल्यांकनासाठी विचारात घेतलेल्या निकषांची अंमलबजावणी केली जात आहे किंवा नाही, याची खात्री या तपासणी दलाकडून केली जाईल. तसेच मशीनरी व सिव्हील घटकासह पायाभूत सुविधांच्या प्रत्येक घटकाचे निरीक्षण आणि युनिट मधील कार्यस्थिती यांच्यासह तेथे लागू असलेल्या प्रबंधन पद्धतीचे मूल्यांकन या दलाकडून करण्यात येईल. याशिवाय प्रक्रिया झालेल्या रुई मध्ये दूषितीकरणाचे प्रमाण तपासण्याकरीता प्रत्यक्ष परीक्षा केली जाईल. मूल्यांकनासाठी विचारात घेतल्या जाणा या पायाभूत व प्रबंधकीय घटकांच्या निकषांचे विवरण मूल्यांकन स्वरुप (परिशिष्ट ।।।) मध्ये दिलेले आहे. भेट देणा या तपासणी दलाकडून दूषितीकरणासह प्रत्येक मूलभत व प्रबंधकीय घटकांना गुण दिले जातील. परिशिष्ट IV मधील सारणी । व ।। मध्ये मूलभूत व प्रबंधकीय घटकांना दिल्या जाणा या गुणांच्या योजनेविषयी माहीती दिलेली आहे. ह्या तपासणी दलाकडून मूल्यांकन रिपोर्ट (परिशिष्ट ।।।) तयार केला जाईल व तो रिपोर्ट मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडे सुपूर्द केला जाईल.

## 7.2 दूषितीकरणाची प्रत्यक्ष परीक्षा

तपासणी दलाकडून रुईच्या गाठी मधील दूषितीकरणाचे मूल्यांकन करण्यासाठी रुईची एक गाठ क्रमरहीत पद्धतीने उघडली जाईल. निवडलेली गाठ ही मूल्यांकनाच्या दिवसीच कापसापासून रुईची गाठ बनविण्याच्या प्रक्रियेतील एक गाठ असली पाहीजे. अशा प्रकारे निवडलेल्या गाठीतील जवळ जवळ 25 किलो रुई तपासणी दलाच्या समोर प्लॅटफॉर्मवर पसरविला जाईल, ज्यामुळे दूषितीकरणाचे संपूर्ण दृष्य सहज पाहायला मिळेल. तपासणी दल कापसातील दूषितीकरणाची प्रत्यक्ष पाहणी करेल व विश्लेषण करून परिशिष्ट IV मधील गुणतालीके नुसार त्याला गुण देण्यात येतील.

## 7.3 छायाचित्र

तपासणी दलाकडून आवश्यकतेनुसार पायाभूत सुविधांच्या घटकांचे छायाचित्र घेण्यात येईल, ज्यामुळे लिखित रिपोर्टला अधिक बळ व मजबूती मिळेल. या व्यतिरीक्त तपासणी दलाकडून प्रबंधकीय घटकांचे सुद्धा आवश्यकतेनुसार छायाचित्र घेण्यात येईल. मूल्यांकन रिपोर्टसह ही सर्व छायाचित्रे मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडे सुपूर्द केले जातील.

## 8.0 संकलन

तपासणी दलाने दिलेल्या मुल्यांकन रिपोर्टची फेरतपासणी मूल्यांकन व श्रे~~णीकरण सेल~~ कडून केली जाईल. पायाभूत तसेच प्रबंधकीय सूविधांच्या घटकांना मिळालेल्या गुणांची टक्केवारी, न्यूनतम पात्रतेच्या तसेच आवश्यक पात्रतेच्या घटकांनी केलेल्या निकषांची पूर्तता याविषयी संपूर्ण संकलन मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून केले जाईल. जर कारखान्याने मुलभूत सुविधा व प्रबंधकीय घटक या दोन्ही मध्ये 80 टक्के किंवा त्या पेक्षा अधिक गुण मिळविले असतील आणि परिशिष्ट V मध्ये दर्शविल्याप्रमाणे घटकांची पूर्तता करत असतील तर

त्याची दखल घेवून मूल्यांकन व श्रेणीकरण सेल परिशिष्ट V प्रमाणे संकलीत केलेला रिपोर्ट शिफारसीसह तांत्रीक श्रेणीकरण पुरस्कार समिती कडे पाठविला जाईल.

## 9.0 श्रेणीकरणाचे मूल्यांकन

9.1 प्रत्यक्ष भेट दिलेल्या दलाने सुपूर्द केलेल्या मूल्यांकन रिपोर्टचे तसेच मूल्यांकन व श्रेणीकरण सेलच्या शिफारसीसह दिलेल्या संकलित रिपोर्टचे तांत्रीक श्रेणीकरण पुरस्कार समिती कडून पुनरावलोकन करुन श्रेणी प्रदान करण्यात येईल किंवा परिशिष्ट I मध्ये दिलेल्या पात्रता निकषांच्या अनुषंगाने कारखान्याला उचित व योग्य श्रेणी प्रदान करण्यात येईल.

9.2 - तांत्रीक श्रेणीकरण पुरस्कार समितीने संबंधित जिनिंग व प्रेसिंग कारखान्याला दिलेल्या श्रेणीसह मूल्यांकन स्थिती रिपोर्ट (एएसआर), मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून सदर कारखान्याला डाक द्वारे पाठविण्यात येईल.

9.3.1 परिशिष्ट I मध्ये दिलेल्या पात्रता निकषांनुसार मूल्यांकन केलेल्या जिनिंग व प्रेसिंग कारखाना कुठल्याच श्रेणीची पात्रता पूर्ण करीत नसल्यास, अशा कारखान्याला ''प्रोव्हीजनल रेटेड स्टेट्स'' अर्थात 'तात्पूरती श्रेणी' चे पत्र प्रदान केले जाईल त्या सोबत मूल्यांकन स्थिती रिपोर्ट (एएसआर) संलग्न केला जाईल. तसेच कारखान्याच्या सुविधांमध्ये आवश्यक ते बदल व सुधारणा केल्या असतील आणि योग्य ते शुल्क भरले असतील तर त्यांच्या विनंती नुसार त्या कारखान्यांचे पुन्हा मूल्यांकन करता येईल.

9.3.2 जर एखादा कारखाना स्टार श्रेणी साठी पात्र आहे परंतु न्यूनतम पात्रता निकषांनसुार कुठली ही एक पात्रता पूर्ण करत नसेल तर अशा कारखान्यांना वेळो वेळी ठरविलेल्या निर्णयाप्रमाणे मर्यादित

काळासाठी एकल स्टार श्रेणी दिली जाईल, जेणेकरुन त्या कारखान्याला ठरविलेल्या कालावधीत त्या विशिष्ट घटकामध्ये आवश्यक ते बदल किंवा सुधारणा करून घेता येतील.

9.3.3 त्या विशिष्ट घटकांमध्ये आवश्यक ते बदल किंवा सुधारणा केल्यानंतर त्या घटकाला योग्य ते गुण देण्यात येईल व कारखान्याला योग्य ती स्टार श्रेणी दिली जाईल.

9.3.4 जर एखाद्या कारखान्याने नेमून दिलेल्या कालावधीत आवश्यक त्या निकषांची पूतर्ता केली नसल्यास त्या कारखान्याला दिलेली एकल स्टार श्रेणी काढून घेतली जाईल.

9.4 जर कारखान्याच्या पिरसरातुन उच्च दाब/ कमी दाब ़विद्युत वाहिनी तार जात असेल परंतू तो कारखाना स्टार श्रेणी साठी पात्र ठरत असेल तर अशा कारखान्याला उच्च दाब/ कमी दाब ़विद्युत वाहिनीच्या संदर्भात 'एडव्हायजरी नोट' देवून लागू असलेली स्टार श्रेणी दिली जाईल.

## 9 श्रेणीकरण प्रमाणपत्र / तात्पूरत्या श्रेणीच्या स्थितीचे पत्र

जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांना त्यांच्या योग्यतेनुसार श्रेणीकरणाचे प्रमाणपत्र किवां तात्पूरत्या श्रेणीच्या स्थिती विषयीचे पत्र दिले जाईल, ज्यामध्ये दिलेली श्रेणीची किंवा तात्पूरत्या श्रेणीची स्थिती, जारी करण्याची तारीख तसेच वैधता कालावधी नमूद केलेला असेल. अशाप्रकारे कारखान्यांना दिलेली श्रेणी किंवा तात्पूरत्या श्रेणीच्या स्थितीची माहिती स्पिनिंग मिल्स, कापसाचे व्यापारी व जिनिंग कारखाने इत्यादींच्या माहितीसाठी, वस्त्र समितीच्या वेबसाइट वर उपलब्ध करण्यात येईल.

## 10 श्रेणीकरणाचा उपयोग

जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांना त्यांच्या योग्यतेनुसार देण्यात आलेल्या श्रेणीचा उपयोग त्यांनी जिनिंग केलेल्या कापसाच्या गुणवत्तापूर्ण उत्पादनाच्या क्षमतेसाठी विपणनाचे साधन म्हणून तसेच मान्यता मिळविण्यासाठी या श्रेणीचा उपयोग करता येईल, परंतू या श्रेणीचा उपयोग केवळ रुईच्या गाठीचे उत्पादन प्रमाणपत्र म्हणून करता येणार नाही.

## 11 श्रेणीकरणाची वैधता आणि पडताळणी भेट.

12.1.1 एकदा दिलेली स्टार श्रेणी 3 वर्षांसाठी वैध राहील. मशीनरी, सिव्हील इंफ्रास्ट्रक्चर इत्यादी सारख्या सुविधा अस्तित्वात आहेत, याची खात्री करण्यासाठी 3 वर्षाच्या वैधता कालावधी दरम्यान प्रमाणित जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांची वस्त्र समिती कडून एकदा मध्यावधी पडताळणी करण्यात येईल. जर आवश्यक असल्यास पडताळणी करण्यासाठी अतिरिक्त भेटींचे आयोजन करण्यात येईल.

12.1.2 मध्यावधी तपासणी करण्यासाठी मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून तज्ञ समिती मधील अधिका यांची नियुक्ती केली जाईल.

12.1.3 मशीनरी, सिव्हील इंफ्रास्ट्रक्चर इत्यादी सारख्या सुविधा अस्तित्वात आहेत, याची खात्री करून तपासणी अधिकारी परिशिष्ट V। प्रमाणे विहित नमून्यात आपला तपासणी रिपोर्ट सादर करतील.

12.2.1 कारखान्यांना तात्पूरत्या श्रेणीची स्थिती एक वर्षासाठी देण्यात येईल. कारखान्यांकडून अशी अपेक्षा आहे की त्यांनी एक वर्षाच्या आत मूल्यांकन स्थिती रिपोर्ट मध्ये चिन्हाकीत करुन दर्शविलेल्या घटकांमध्ये

सुधारणा करावी व श्रेणीकरणाच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करावा. तात्पूरत्या श्रेणीची स्थिती तीच्या गुणवत्तेच्या आधारे वाढविता येईल.

12.2.2 ‘तात्पूरत्या श्रेणीची स्थिती’ या श्रेणी अंतर्गत असलेल्या कारखान्यांना त्यांच्या पुनर्मूल्यांकना नंतर देण्यात आलेल्या स्टार श्रेणीचा कालावधी हा त्यांना ‘तात्पूरत्या श्रेणीची स्थिती’ देणा या पत्राच्या तारखेपासून 3 वर्षापैकी शिल्लक राहिलेल्या कालावधीसाठी असेल.

12.3.1 न्यूनतम पात्रता निकषांनुसार कुठल्याही एका घटकाच्या आवश्यकतेची पूर्तता न करणा या परंतू स्टार श्रेणीकरणाच्या इतर पात्रता पूर्ण करणा या कारखान्यांना मर्यादित काळासाठी दिलेली एकल स्टार श्रेणी ही वेळो-वेळी ठरविण्यात आलेल्या काळासाठी वैध असेल.

12.3.2 विशिष्ट घटकांच्या निकषांची पूर्तता केल्यानंतर लागू करण्यात आलेली वर्तमान स्टार श्रेणी ही आरंभी देण्यात आलेल्या एकल स्टार श्रेणीच्या प्रमाणपत्राच्या तारखेपासून 3 वर्षापैकी शिल्लक राहिलेल्या काळासाठी वैध असेल.

## 13. दिलेल्या श्रेणीची अवनती

मध्यावधी तपासणी किंवा अतिरिक्त तपासणीच्या भेटी दरम्यान जर असे निदर्शनास आले की मूलभूत सुविधा व प्रबंधकीय पद्धतींच्या दृष्टिने कारखान्याची गुणवत्ता ही आरंभी केलेल्या मूल्यांकनाच्या तुलनेने खाली आलेली आहे तर अशा कारखान्यांना ‘‘डाउनग्रेड’’ किंवा ‘‘श्रेणी हीन’’ कारखाना मानले जाईल. श्रेणी दिलेल्या कारखान्याच्या श्रेणी-हीनते बाबत अधिक कार्यवाही करण्यासाठी मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून त्यांची शिफारस तांत्रीक श्रेणीकरण पुरस्कार समितीकडे पाठविल्या जाईल. तांत्रीक श्रेणीकरण पुरस्कार समिती श्रेणी हीनते बाबत अशा कारखान्यांना कनिष्ठ श्रेणी देण्याचा किंवा दिलेली श्रेणी काढून घेण्याचा योग्य तो निर्णय घेईल. श्रेणी विषयी घेतलेल्या निर्णयाचे पत्र सचिव किंवा संचालक, वस्त्र समिती यांच्या स्वाक्षरीने

संबंधीत कारखान्याला पाठविले जाईल तसेच ही अद्यावत केलेली माहीती वस्त्र समितीच्या वेबसाइटवर प्रकाशित केली जाईल.

## 14.0 श्रेणीचे नूतनीकरण

14.1 प्रमाणित जिनिंग व प्रेसिंग कारखाने त्यांच्या स्टार श्रेणी प्रमाणपत्राचा कालावधी समाप्त होण्याआधी किंवा समाप्तीनंतर एक वर्षापर्यंत श्रेणीच्या नूतनीकरणासाठी अर्ज करु शकतात. स्टार श्रेणी प्रमाणपत्राचा कालावधी समाप्तीच्या एक वर्षानंतर नूतनीकरणासाठी ईच्छूक असणा या कारखान्यांचा विचार प्रकरणानुसार विचाराधिन राहील.

14.2 पुढील तीन वर्षाच्या काळासाठी श्रेणीच्या नूतनीकरणाचे शुल्क रुपये 25,000/ अधिक लागू कर एवढे आहे. श्रेणी नूतनीकरणाच्या शुल्कामध्ये तीन वर्षाच्या काळात एक मध्यावधी पडताळणी भेट समाविष्ट आहे.

14.3 मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून नूतनीकरणाच्या तपासणीसाठी तज्ञ समितीतील सदस्यापैकी दोन अधिका यांची नियुक्ती तपासणी दलात केली जाईल.

14.4 मशीनरी, सिव्हील इंफ्रास्ट्रक्चर इत्यादी सारख्या सुविधा अस्तित्वात आहेत, याची खात्री करून तपासणी दल परिशिष्ट VII प्रमाणे विहित नमून्यात नूतनीकरण रिपोर्ट सादर करतील तसेच कारखान्याने मूलभूत सुविधांमध्ये जर काही सुधारणा केल्या असल्यास त्यांचे सत्यापन व नोंद नूतनीकरण रिपोर्टमध्ये करतील.

14.5 मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून नूतनीकरण रिपोर्टची तपासणी केली जाईल व त्यांच्या शिफारसीसह तो रिपोर्ट संचालक (ईपीक्यूए) यांना सादर करतील.

14.6 नूतनीकरण रिपोर्ट व त्यावरील मूल्यांकन व श्रेणीकरण सेलने (एआरसी) दिलेल्या शिफारसींच्या निष्कर्षांच्या आधारे कारखान्याला दिलेल्या स्टार श्रेणीला संचालक (ईपीक्यूए) अनुमोदन देतील.

14.7 श्रेणी नूतनीकरणाच्या अनुमोदनानंतर, मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून स्टार श्रेणी नूतनीकरणाचे प्रमाणपत्र जारी केल्या जाईल, जे पुढील तीन वर्षांसाठी वैध असेल आणि आरंभीच्या प्रमाणपत्रा प्रमाणे तीन वर्षा दरम्यान मध्यावधी पडताळणी केली जाईल.

14.8 श्रेणी नूतनीकरणाला अनुमोदन न मिळाल्यास मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून नूतनीकरण न करण्याच्या कारणांसह कारखान्याला पत्राद्वारे कळविले जाईल.

## 15.0 उच्च श्रेणीकरणाचे मूल्यांकन

15.1 स्टार श्रेणी धारक जिनिंग व प्रेसिंग कारखाने आपल्या मुलभूत सुविधा व प्रबंधन पद्धतीत अधिक सुधारणा करुन उच्च स्टार श्रेणीसाठी अर्ज करू शकतात आणि मध्यावधी पडताळणी किंवा नूतनीकरणाच्या वेळेस नव्याने मूल्यांकन करून उच्च स्टार श्रेणी मिळवू शकतात. स्टार श्रेणी प्रमाणपत्राच्या वैधते दरम्यान लागू असलेल्या तपासणी शुल्कासह कारखाने नव्याने उच्च स्टार श्रेणीसाठी तपासणीसाठी अर्ज करु शकतात.

15.2 कारखान्याने मुलभूत सुविधा व प्रबंधन पद्धतीत अधिक सुधारणा करून उच्च स्टार श्रेणीसाठी नव्याने मूल्यांकन करण्यास विनंती पत्र सादर केल्यास त्यांची तपासणी केली जाईल. कारखान्यांनी तसे विनंती पत्र पुरेशा वेळेपूर्वी सादर करावे अशी अपेक्षा आहे.

15.3 विनंती अर्ज प्राप्त झाल्यावर, मूल्यांकन व श्रेणीकरण सेल कडून नव्याने मूल्यांकन करण्यासाठी तज्ञ समिती मधील अधिका यांची नियुक्ती केली जाईल.

15.4 कारखान्याने केलेल्या सुधारणांची तपासणी नियुक्त अधिका यांकडून केली जाईल. उच्च श्रेणीकरणासाठी जर कारखाना प्रथमदर्शनी योग्य वाटत असल्यास आरंभिक मूल्यांकनाच्या वेळेस अनुसरण केलेल्या कार्यपद्धती नुसार तपासणी अधिकारी नव्याने मूल्यांकन करतील आणि परिशिष्ट ।।। मधील नमून्यानुसार छायाचित्रासह रिपोर्ट सादर करतील. आरंभिक मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचे अनुसरण करुन मूल्यांकन व श्रेणीकरण निकषांनुसार योग्य ती श्रेणी कारखान्यास दिली जाईल.

15.5 अशा प्रकारे नव्याने मूल्यांकन करुन देण्यात आलेली श्रेणी ही पूर्वी दिलेल्या श्रेणीच्या तीन वर्षांच्या वैधता काळापैकी शिल्लक राहिलेल्या काळासाठी वैध असेल.

## 16.0 पुनर्तपासणी करण्यासाठी विनंती व पुनर्तपासणी शुल्क यांची तरतूद

16.1 पुर्व नियोजित मूल्यांकन व मध्यावधी पडताळणी या व्यतीरिक्त तात्पूरत्या श्रेणी स्थिती पासून स्टार श्रेणी प्राप्त करण्यासाठी किंवा मर्यादित अवधी एकल स्टार श्रेणी पासून ते नियमित स्टार श्रेणी साठी तसेच स्टार श्रेणी अद्यावत करण्यासाठी कारखाने विनंती करु शकतात.

16.2 पुनर्तपासणी शुल्क रुपये 15,000/ + लागू कर असे आहे.

16.3 श्रेणीकरण प्रमाणपत्राच्या/ तात्पूरत्या श्रेणी स्थितीच्या पत्राच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत पुनर्तपासणी करुन घेणा या कारखान्यांना पुनर्तपासणी शुल्क द्यावे लागणार नाही.

16.4 संमतीने निश्चीत केलेल्या तारखेला तपासणी दलाच्या भेटीच्या वेळी कारखाना बंद असेल, असे कारखाने सुद्धा मूल्यांकनाकरीता विनंती करु शकतात. असे कारखाने पहिल्या भेटीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत मूल्यांकना करीता विनंती करीत असल्यास त्या कारखान्यांना पुन्हा शुल्क द्यावे लागणार नाही.

**********